# पुणे मेट्रो

संपादक : श्री.संजय किसन गायकवाड






NEW SAGAR HOTEL

Dahi Wada, Masala Dosa, Lassi, Chole Bhature,Sabudana Khichdi, Chole Samosa

76,new bazar, Khadki, Pune-411003



वर्ष : १६ अंक : १९ मराठी साप्ताहिक पुणे गुरुवार १३ ते १९ जून २०२४ RNI. No. MAHMAR/2009/27295 पाने : ४ किंमत २ रु.


## विधानसभेला मोदी जेवढ्या जास्त सभा घेतील तेवढा 'मविआ'ला फायदा होईल; शरद पवारांचा मोदींना टोला



मुंबई : लोकसभा निवडणुकीप्रमाणे आगामी विधानसभा निवडणुकीतही मोठे यश मिळवण्यासाठी महाविकास आघाडीने कंबर कसली आहे. महाविकास आघाडी एकत्र लढणार की स्वबळावर लढणार यावर तर्कवितर्क लावले जात होते.मात्र आज मुंबईत महाविकास आघाडीचीसंयुक्त पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेत खासदार शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार निशाणा साधला. शरद पवार यांनी लोकसभा निवडणुकीतील राज्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रचारसभांचा आकडा सांगत स्ट्राइक रेट काढला.पंतप्रधान मोदींच्या सभा आणि रोड शो जिथे झाल्या तिथे आमच्या उमेदवारांना जनतेने मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला. विधानसभेच्या निवडणुकीवेळी पंतप्रधानांच्या जेवढ्या जास्त जागांवर सभा होतील तेवढी आमची स्पष्ट बहुमताच्या दिशेने वाटचाल होईल. त्यामुळे मोदींना धन्यवाद देणे हे माझं कर्तव्य आहे, असा टोलाही शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लगावला.

आज मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या महाविकास आघाडीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत ते बोलत होते.यावेळी त्यांनी राज्यातील विविध विषयावर भाष्य केले. अजित पवारांना सोबत घेऊन भाजपने आपली किंमत कमी करुन घेतली या प्रश्नावर बोलताना शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली.

त्यांना नेमकं एवढंच सांगायचे आहे की, महाराष्ट्राच्या जनतेने आमचा पराभव केला. त्या सर्वांची कारणे अनेक आहेत.

पण ते अजूनही बोलू इच्छित नाहीत. त्यांचा अनुभव त्यांनी सांगितला. आम्ही कशाला काय सांगू, अशी सूचक प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली.

## औंध: दरोड्याच्या उद्देशाने केलेल्या हल्ल्यात जेष्ठ नागरिकाचा मृत्यू


पुणे : औंध भागातील परिहार चौक परिसरातून पहाटे फिरायला निघालेल्या एका ७७ वर्षीय ज्येष्ठ नागरिकावर चोरट्यांनी गुरुवारी (दि. १३) हल्ला केला होता. यामध्ये ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला होता. त्यानंतर चतु:श्रृंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय सुधीर कुलकर्णी यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. बदलीचे आदेश अपर पोलीस आयुक्त, प्रशासन अरविंद चावरिया यांनी शुक्रवार (दि.१४) काढले आहेत. दरम्यान, अजय कुलकर्णी यांनी बदलीसाठी अर्ज केला होता. याच दरम्यान औंध मध्ये ही घटना घडली. समीर राय चौधरी (वय ७७) असे मृत्यू झालेल्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. चौधरी यांच्यावर चोरट्यांनी गुरुवारी हल्ला केला होता. चौधरी यांच्या डोक्यात चोरट्यांनी गज मारला. मेंदू-मृत झालेल्या चौधरी यांचा शुक्रवारी सायंकाळी औंधमधील खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. चोरट्यांनी चौधरी यांच्यासह तिघांवर हल्ला केला होता.याप्रकरणी चतु:शृंगी पोलिसांनी चोरट्यासह त्याच्याबरोबर असलेल्या तीनअल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेतले. या घटनेनंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कुलकर्णीयांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे.दरम्यान, पुढील आदेश होईपर्यंत वाहतूक शाखेतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश संखे हे चतु:श्रृंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हूनन तात्पुरत्या स्वरूपात कामकाज पाहणार आहेत. असे आदेश देण्यात आले आहेत.

## बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी शिक्षण आणि प्रशिक्षणावर भर द्यावा : डॉ.नीलम गोऱ्हे

पुणे : बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी नियमांमध्ये सुधारणा करण्यासह शाळाबाह्य मुलांचे शिक्षण आणि पाल्य व पालकांच्या प्रशिक्षणावर भर द्यावा, तसेच वाहतूक नियोजन आणि रस्ता सुरक्षेबाबतही आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिले.पुण्यात अलिकडे झालेल्या अपघाताच्या पार्श्र्वभूमीवर वाहतूक नियोजन, बालगुन्हेगारी प्रतिबंध आणि ससून रुग्णालयातील व्यवस्थापनाबाबत दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस महिला व बालविकास आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे, महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवडचे प्र.पोलीस आयुक्त सुनील रामानंद, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, ससूनचे अधिष्ठाता डॉ.चंद्रकांत म्हस्के, उत्पादन शुल्क विभागाचे उपअधीक्षक सुजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आदी उपस्थित होते.डॉ.गोऱ्हे म्हणाल्या, बाल न्याय कायद्यानुसार गंभीर गुन्ह्याबाबत कारवाई करताना गुन्हेगारांना प्रौढ समजण्यात यावे यादृष्टीने नियमांचा अभ्यास करून कार्यप्रणाली निश्र्चित करण्याचा प्रयत्न करावा.

## सदोष डांबरीकरण व चेंबर सफाई अभावी किरकोळ पावसात देखील पाण्याचे तळं

पुणे : अवकाळी आणि अल्पावधीत पडलेल्या मुसळधार पावसामुळे सर्वत्र पाणी साचल्याचा दावा प्रशासनाने केल्याचे वाचनात आले, तर विविध सोसायट्यात ब्लॉक बसविल्याने ही परिस्थिती ओढवल्याचा शोध देखील लागला असल्याचे वृत्तपत्रातून समजले.महिन्याभरापूर्वी उत्तम डांबरीकरण केलेला समर्थ पथ ( अलंकार पोलीस स्टेशन ते प्रतिज्ञा मंगल कार्यालय ) आणि कर्वेनगर मधील कमीन्स इंजिनियरिंग कॉलेज समोरचा पाणंद रस्ता !!चार दिवसापूर्वीच्या अकल्पित पावसामुळे सगळीकडे पाणी साचले होते मात्र आज किरकोळ पाऊस झाला तरी जागोजागी तळं साचलेलं दिसतंय. हे डांबरीकरण नीट न झाल्यामुळे आहे असे स्पष्टपणे दिसत आहे.रस्त्याचा उतार, चेंबर चे ठिकाण,याचा अभ्यास न करताच डांबरीकरण केले जाते आणि सामान्य नागरिकांना मात्र त्रास सहन करावा लागतो.पावसाळी व ड्रेनेज लाईन्स च्या सफाई बाबत तर न बोललेलेच बरे.समर्थ पथावर प्रतिज्ञा मंगल कार्यालयासमोरील रस्त्यावर प्रचंड पाणी साचले व तेथील सोसायटीत घुसलेले पाणी चार तासानंतर उपसता आले. गत वर्षी देखील येथे अशीच गंभीर स्थिती झाली होती व स्वतः आयुक्त विक्रमकुमार यांनी रात्री उशिरापर्यंत



पाण्याचा निचरा होईपर्यंत तेथे थांबून मदतकार्य केले होते. यावर्षी याची पुनरावृत्ती होताना नागरिकांना प्रश्र्न पडला की येथे मोठ्या व्यासाची पावसाळी लाईन टाकण्याचे प्रशासनाचे आश्वासन कुठे विरले ? मिळालेल्या माहितीनुसार यासाठी एक कोटीचे बजेट देखील मान्य झाले होते, ते कुठे गेले याची चौकशी व्हावी अशी आग्रही मागणी संदीप खर्डेकर यांनी केली.आता टोलवा टोलवी न करता प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयातून पाणी साचणाऱ्या ठिकाणांचा अहवाल मागवावा व तेथे काय उपाययोजना करता येईल ते बघून पुणेकरांना दिलासा द्यावा अशी आग्रही मागणी केली.

## पुणेकरांनो सावधान...फेक कॉल्सवर विश्वास ठेवू नका : एमएनजीएलच्या बिलिंग विभागाचे प्रमुख आनंद जैन यांचे ग्राहकांना पुन्हा आवाहन

पुणे : एमएनजीएलने आपल्या ग्राहकांना मोबाईल पद्वारे बिले भरण्यासाठी किंवा अपडेट करण्यासाठी कोणतीही सुविधा प्रदान केलेली नाही. त्यामुळे अशा बनावट किंवा फसव्या कॉल्सवर विश्र्वास ठेवू नका, असे आवाहन एमएनजीएलच्या बिलिंग विभागाचे प्रमुख आनंद जैन यांनी पुन्हा केले आहे.एमएनजीएलकडे फेक कॉल्स आणि मेसेजसंदर्भात पुन्हा तक्रारी दाखल झाल्या आहेत. ग्राहकांना फोन करुन अथवा मेसेजद्वारे 'मोबाईल लिंक डाऊनलोड करुन पैसे भरा. अन्यथा तुमचे गॅस कनेक्शन बंद करण्यात येईल,' किंवा तुमचे मागील महिन्याचे बिल अपडेट न केल्यामुळे आज रात्री MNGL गॅस कनेक्शन खंडित केले जाईल असे सांगितले जात आहे. यातून एमएनजीलची प्रतिमा मलिन होत आहे. यातून एमएनजीलची प्रतिमा मलिन होत आहे. त्यामुळे एमएनजीएलच्या व्यवस्थापनाने सदर बाबीची दखल अतिशय गांभीर्याने घेतली आहे. तसेच, एमएनजीएलने ग्राहकांनाही सूचित केले आहे.सध्या विविध सेवा संस्थांबाबत अशा सायबर फसवणूक दिवसेंदिवस वाढत आहे. ही चिंताजनक बाब आहे. त्यामुळे ग्राहकांना विनंती करतो की त्यांनी सतर्क राहावे आणि अशा फसव्या कृत्यांना बळी पडू नये. असे आवाहन एमएनजीएलने केले आहे. तसेच यासंदर्भात एमएनजीएलने पुणे पोलीस आयुक्तांकडे तक्रार देखील दाखल केली आहे.त्यासोबतच, ग्राहकांमध्ये जनजागृतीसाठी आपली वेबसाईट आणि अधिकृत सोशल मीडिया हँडल एक्स ( पूर्वीचे ट्विटर ), Instagram आणि फेसबुक याद्वारे ग्राहकांना सूचित व सतर्क केले आहे. त्यासोबतच विविध वृत्तपत्रांमधून (मराठी ,हिंदी इंग्रजी), जाहीर नोटीस देऊन, रेडिओ जिंगल्सच्या माध्यमातून आणि ग्राहकांना एसएमएस तसेच व्हॉट्सअँपद्वारे ((मराठी, हिंदी इंग्रजी), संदेश पाठवून जनजागृती करत आहे.

## मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला अतिशय दिमाखदार सोहळ्याने प्रारंभ

मुंबई, : जागतिक दर्जाच्या समांतर सिनेमाच्या जादुई विश्र्वाला भारतभरातील चित्रपट रसिकांच्या जवळ आणणाऱ्या, सात दिवस चालणाऱ्या माहितीपट, लघुपट आणि ॲनिमेशनपटांच्या १८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांच्या हस्ते आणि महाराष्ट्राचे संस्कृती मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.उद्घाटन समारंभात बीजभाषण करताना मुरुगन म्हणाले की चखत्रऋ हे जगभरातील चित्रपट निर्मात्यांना एकत्र आणणारे एक प्रतिष्ठित व्यासपीठ आहे. खऱ्या अर्थाने भावना दर्शविण्यासाठी लघुपट महत्त्वाची भूमिका बजावतात. यावेळच्या मिफ मध्ये बऱ्याच गोष्टी पहिल्यांदा होत असल्याचे माहिती प्रसारण राज्यमंत्री म्हणाले. यावेळी प्रथमच मिफचे स्क्रीनिंग ४ ठिकाणी होईल. मुरुगन पुढे म्हणाले की भारत हे मनोरंजनविषयक आशय निर्मितीचे केंद्र आहे. कथा सांगण्याची आपली परंपरा आहे. आपण आपल्या आई आणि आजींच्या कथा ऐकत मोठे झालो आहोत.त्यांनी पुढे माहिती आणि प्रसारण मंत्रालयाद्वारे सुरू केलेल्या चित्रपट सुविधा कार्यालयाची माहिती दिली.


## भारतीय रेल्वेची लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली नोंद

पुणे : एकाच दिवशी अनेक ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या सार्वजनिक सेवेच्या कार्यक्रमाला सर्वाधिक लोकांनी हजेरी लावण्याचा विक्रम नोंदवल्याबद्दल, भारतीय रेल्वेची नोंद प्रतिष्ठेच्या लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे. रेल्वे मंत्रालयाने २६ फेब्रुवारी २०२४ रोजी एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये २,१४० ठिकाणी ४०,१९,५१६ लोक उपस्थित होते.हा कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रेल्वे मार्गावरून/खालून जाणाऱ्या पुलांचे उद्घाटन आणि रेल्वे स्थानकांच्या पायाभरणीसाठी आयोजित करण्यात आला होता.एकाच वेळी अनेक जणांना एकत्र आणण्याच्या या प्रयत्नांची दखल घेतली गेली,

## Neet परीक्षा स्कॅम'ची न्यायालयीन चौकशीची मागणी..!

'परीक्षा आयोजित करणाऱ्या संस्थेच्या / व्यवस्थेच्या पॅनल प्रमुखा' कडूनच् निष्पक्ष चौकशी कशी..? काँग्रेस चा संतप्त सवाल प्रा. प्रदीपकुमार जोशी हे छएएढ आयोजित करणाऱ्या राष्ट्रीय प्रवेश परीक्षा एजन्सी छढ-_एुगी चे अध्यक्ष..!पुणे - दि १३ जून २०२४छएएढ प्रवेश परीक्षा आयोजित करणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या प्रमुखाला 'स्वतःच्याच अखत्यारीतील अनियमिततेच्या आरोपांची चौकशी' करण्याचे काम दिल्यास तपास निष्पक्ष व न्याय्य कसा असू शकतो (?) असा संतप्त सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे राज्य प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी विचारला आहे.

'वैद्यकिय क्षेत्र' हे नागरी जीवन व आरोग्या विषयी काळजी घेणारे आहे..! जीवनात महत्वाकांक्षी लक्ष्य प्राप्ती करू इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यांना 'वैद्यकिय, आयुर्वेदीय, दंतकीय, होमिओपॅथी' पदवी-पदवीत्तोर शिक्षणा करीता केंद्र सरकार तर्फे आयोजित छ्शशीं ची प्रवेश पात्रता परीक्षा द्यावी लागते. मात्र या छ्शशीं प्रवेश - पात्रता परीक्षेवर पेपर फुटीचे, हेरा फेरी व स्कॅम'चे गैर प्रकार झाल्याचे समोर आल्यावर, केंद्र सरकारने चौकशी-मागणी मान्य केल्याचे दाखवले. व युपीएससी'चे



मोदी काळातील माजी संचालक प्रा प्रदीपकुमार जोशी यांनाच चौकशी साठी नेमल्याचे सांगितले. मात्र प्रा प्रदीपकुमार जोशी हे छ्शशीं ची परीक्षा आयोजित करणाऱ्या 'राष्ट्रीय परीक्षा एजन्सी' चे छढ- चे प्रमुख असल्याने सदर परीक्षा व्यवस्थापन बधणाऱ्या प्रमुखा कडुनच् निष्पक्ष व न्याय्य चौकशी कशी होऊ शकेल..? असा परखड व संतप्त सवाल काँग्रेस राज्य प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केला . सदर प्रकरणी केंद्र सरकार तर्फे सर्वोच्च न्यायालयात जी ऊत्तरे दिली गेलीत त्यात १५६३ विद्यार्थ्यांना ग्रेस मार्क दिल्याचे परत घेऊन(?) तेवढ्याच विद्यार्थ्यांची पुन्हा फेर परीक्षा घेण्याचे धक्कादायक व हास्यास्पद विधान देखील केल्याचे समोर आले असून, हरीयाना मधील एकाच केंद्रात ७ विद्यार्थ्यांना सर्वोच्च समान मार्क्स मिळाल्याची बाब समोर आली आहे..! तसेच काही लाख रू देण्याची तयारी ठेवा व प्रश्र्न-पत्रीका मिळवा असे खाजगी कोचिंग क्लासेस चालवणाऱ्यांचे व्हीडीओ देखील पुढे आले असुन, देशातील विद्यार्थांच्या भवितव्याशी व जनतेच्या जीवाशी खेळणारा हा निंद्य प्रकार असून, याची मा ऊच्च वा सर्वोच्च न्यायालया तर्फे सुमोटो चौकशी व्हावी अशी मागणी काँग्रेसचे राज्य प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केली..! क

## संपादकीय ...

# हेल्थ मंत्रा । आरोग्य मंत्र

तरूणपणीच म्हातारपण आणतात या सवयी, आजारांचं घर बनतं शरीर.....!!!

लोकांना आयुष्य जास्त जगायचं असतं, पण त्यासाठी आपल्या खराब सवयी सोडणं त्यांना जमत नाही. अशा अनेक सवयी असतात ज्या सामान्यपणे लोकांमध्ये बघायला मिळतात. या सवयी फार नुकसानकारक असतात तरीही लोक त्याची चिंता करत नाहीत. याच कारणाने लोक कमी वयातच वृद्ध दिसू लागतात. अनेक गंभीर आजारांचे शिकार होऊन आपला जीवही गमावतात.

तुम्हीही तुमच्या या सवयी सोडून चांगलं जगण्याचा विचार करा...

झोप कमी घेणं...आजकाल स्मार्टफोन आणि इंटरनेटच्या जमान्यात लोकांची झोप उडाली आहे. बरेच लोक असे आहेत जे ना वेळेवर झोपू शकतात ना वेळेवर उठू शकतात. सुरवातीला कमी झोप घेतल्याने इतकी काही समस्या होत नाही, पण काही दिवसाने समस्या सुरू होतात. शरीराला आरामाची गरज असते, जी झोपेच्या माध्यमातून पूर्ण होते. त्यामुळे दिवसातून किमान ७ ते ८ तास झोप घ्यावी.

केमिकल फ्री आणि प्रोसेस्ड फूड...फिट आणि निरोगी रहायचं असेल केमिकल फ्री आणि प्रोसेस्ड फूडचा समावेश असावा. आजकाल बाजारात मिळणारे प्रॉडक्ट्स फार नुकसानकारक असतात. जर स्वत:ला तरूण ठेवायचं असेल तर चांगलं खाणंपिणंही गरजेचं आहे.

डाएटमध्ये ताजी फळं आणि भाज्यांचा समावेश करावा. जास्त मांस खाऊ नका. तसेच जास्त तळलेले आणि भाजलेले पदार्थ खाणंही टाळावं.

रोज फिजिकल ॲक्टिव्हिटी करणं...जर तुम्ही आळस करून कोणतीही फिजिकल ॲक्टिव्हिटी करत नसाल तर ही सवय तुमच्यासाठी अजिबात चांगली नाही. जर तुम्ही रोज एक्सरसाइज किंवा फिजिकल ॲक्टिव्हिटी केली तर अनेक गंभीर आजारांपासून तुमचा बचाव होऊ शकतो. सोबतच तुमचं मानसिक आरोग्यही चांगलं राहतं. त्यामुळे रोज एक्सरसाइज आणि मेडिटेशन करा.

दारू आणि सिगारेटचं सेवन...आजकाल दारू आणि सिगारेटचं सेवन कॉमन झालं आहे. पण ते तुमच्या आरोग्यासाठी जास्त नुकसानकारक आहे. जर तुम्ही जास्त काळ दारू आणि सिगारेटचं सेवन केलं तर तुमच्या जीवाला धोका होऊ शकतो.

## 'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे पुण्यातील शिवाजीनगर येथे 'लाइटस्टाइल' दालनाचे उदघाटन

पुणे, : आपली परंपरा आणि दागिन्यांच्या उत्कृष्टतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या 'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे जेएम रोड, शिवाजीनगर, पुणे येथे 'लाइटस्टाइल' हे नवीन भव्य दालन सुरू करण्यात आले आहे. ५०० चौरस फूट जागेत विस्तारलेल्या या दालनात कमी वजनाच्या सोने, चांदी आणि हिऱ्यांच्या दागिन्यांची विस्तृत श्रेणी उपलब्ध करण्यात आली आहे. हे भव्य दालन म्हणजे 'पीएनजी ज्वेलर्स'च्या दुसऱ्या लाइटस्टाइल ज्वेलरी दालनासह लाइटवेट लाइफस्टाइल ज्वेलरीमध्ये ब्रँडचा विस्तार वाढत असल्याचे प्रतीक आहे.

मराठी आणि बॉलिवूड चित्रपटसृष्टीत आपले योगदान देणाऱ्या प्रसिद्ध अभिनेत्री सई ताम्हणकर यांच्या उपस्थितीत दालनाचे भव्य उदघाटन झाले.'पीएनजी ज्वेलर्स'ची लाइटस्टाइल ब्रँड श्रेणी असून आजच्या सक्षम महिलांसाठी अत्यंत समर्पणाने डिझाइन केलेली आहे. हा ब्रँड 'पीएनजी ज्वेलर्स'च्या विश्र्वासाचा वारसा पुढे नेत असून विशेषत: २२ कॅरेट, १८ कॅरेट आणि १४ कॅरेट मधील कमी वजनाच्या सोने आणि हिऱ्याच्या दागिन्यांवर लक्ष केंद्रित करतो. हा ब्रँड विश्र्वासार्हता या शब्दाचे प्रतीक असून आधुनिक काळातील महिलांचा विचार करता त्यांचा दैनंदिन जीवनात सहजपणे वापरता यावे, यासाठी उत्कृष्ट दागिन्यांची श्रेणी सादर केली आहे.जेएम रोड, शिवाजीनगर स्थित नवीन लाइटस्टाइल दालनामध्ये कमी वजनाच्या दागिन्यांची उत्कृष्ट आणि वैविध्यपूर्ण श्रेणी उपलब्ध करण्यात आली आहे. लाइटस्टाइल दालनामध्ये क्लिष्ट डिझाइन असलेल्या सोन्याच्या दागिन्यांपासून ते चमकदार नैसर्गिक हिऱ्याच्या दागिन्यांपर्यंत, कानातले, पेंडंट सेट, चेन सेट, नेकलेस आणि ब्रेसलेट यांसारख्या उत्पादनांच्या श्रेणींचा समावेश आहे.'पीएनजी ज्वेलर्स'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले की, लाइटस्टाइल बाय पीएनजी ज्वेलर्स दालनाचे उदघाटन म्हणजे हलक्या वजनाच्या दागिन्यांच्या श्रेणीच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. नोकरी व व्यवसाय करणाऱ्या महिलांना दैनंदिन कामकाजामध्ये दागिन्यांचा वापर सहजपणे करता यावा या उद्देशाने कमी वजनाचे उत्कृष्ट दागिने घडविण्यात आले आहेत.

**पिंपरी चिंचवड संपर्क कार्यालय**
**स.नं.१/१/२ लक्ष्मी नगर, पिंपळे गुरव पुणे - ४११०६१**
**संपर्क : ९५५२५५४३८**

साप्ताहिक पुणे मेट्रो हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री.संजय किसन गायकवाड यांनी सहर आर्ट प्रेस, ५ नानापेठ, लक्ष्मीरोड, पुणे - ०२ येथे छापून ५३/५४ पुणे-मुंबई रोड, बोपोडी, पुणे - ०३ येथून प्रकाशित केले आहे.
**Dec. No.:- SDM/SR/16/2019**
---------------------------------------
Email:punemetro1@gmail.com, epunemetro@gmail.com
सदर अंकात प्रसिद्ध झालेल्या वृत्तांशी किंवा लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व दावे पुणे न्यालयांतर्गत चालतील.
(*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)फोन :
9850093959, 9604764228

## भारतीय खरेदीदारांना ग्रीसमध्ये घराकरिता गुंतवणूक करण्याचे प्रोत्साहन, कायमस्वरूपी युरोपीय निवासाचे स्वप्न साकार; ३१ ऑगस्टपूर्वी नियमबदल होण्यापूर्वी रु. २.५ कोटीपर्यंतचे परवडणारे दर

नवी दिल्लीः : ग्रीसमध्ये स्वप्नातील सुट्टीचे घर (हॉलिडे होम) तसेच कायमस्वरूपी निवासासह गोल्डन व्हिसा असणे, ३१ ऑगस्ट २०२४ पासून सर्वांसाठी अधिक महाग होणार आहे. सप्टेंबर महिन्यात ग्रीक सरकार नवीन कायदे अंमलात आणेल. या कायद्यांमुळे जागतिक नागरिकांना ग्रीसमध्ये स्थावर मालमत्तेच्या मालकीसाठी किमान गुंतवणुकीच्या दुप्पट रक्कम आकारण्यात येईल. ग्रीस आणि सायप्रसमधील प्रिमियम सदनिका आणि लक्झरी व्हिलासह निवासी, व्यावसायिक आणि सुट्टीच्या निवासस्थानांमध्ये विशेष प्राविण्य असलेली लेप्टोस इस्टेट्स ही एक प्रमुख स्थावर मालमत्ता आणि मालमत्ता विकास कंपनी, भारतातील हाय-नेट वर्थ असलेल्या व्यक्ती आणि गुंतवणुकदारांना या वर्षाच्या अखेरीस नियम बदलण्यापूर्वी झटपट कृती करण्यासाठी आणि ग्रीसमध्ये त्यांची मालमत्ता गुंतवणूक करण्यासाठी आमंत्रित करते.गेल्या काही वर्षांत, २०१३ मध्ये सुरू झालेल्या ग्रीसच्या गोल्डन व्हिसा प्रोग्रामची लोकप्रियता आणि मागणी वाढली आहे. ज्यामुळे ग्रीक सरकारने स्थावर मालमत्ता गुंतवणूक तसेच कायमस्वरूपी निवासासाठी प्रवेशाबाबत पुनर्विचार केला.

दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी लागू होण्याची अपेक्षा असलेल्या ग्रीसच्या गोल्डन व्हिसा प्रोग्रामशी संबंधित नवीन नियमांनुसार, देशातील स्थावर मालमत्ता व्यवहारांसाठी किमान गुंतवणुकीचे दोन स्लॅब असतील. टियर ख, ज्यात ॲटिका, थेस्सलोनिकी, मायकोनोस, सँटोरिनी आणि बेटांसारख्या लोकप्रिय क्षेत्रांचा समावेश आहे, किमान गुंतवणूक सध्याच्या ए ५००,००० वरून ए ८००,००० पर्यंत जाण्याची अपेक्षा आहे; तसेच टियर खख मध्ये ग्रीसच्या इतर सर्व प्रदेशांचा समावेश असून एंट्री पॉइंट सध्याच्या ए २५०,००० वरून ए ४००,००० पर्यंत जाईल. कालमर्यादा जसजशी जवळ येईल तसतशा किंमती वाढण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे भारतीय गुंतवणुकदारांसाठी ग्रीकपद्धतीच्या घराचे मालक होण्याचे स्वप्न असाध्य होऊ शकते. आम्ही हाय-नेट वर्थ असलेल्या व्यक्ती आणि गुंतवणुकदारांना ग्रीसमध्ये कायमस्वरूपी निवासस्थानावर शिक्कामोर्तब करण्याची आयुष्यात एकदाच मिळणारी ही अनोखी संधी बिलकूल न सोडण्याचे आवाहन करतो. ग्राहकांना गुंतवणुकीवर किमान ए२५०,००० च्या परवडणाऱ्या किंमतीत आश्र्वासक परतावा मिळण्याची संधी मिळवण्याचा आनंद उपलब्ध झाला आहे. एकदा नवीन नियम अंमलात आले की, खर्च दुप्पट होईल आणि ती एक उत्तम संधी हातातून सुटेल. आमच्याकडे संपूर्ण ग्रीसमध्ये आणि पॅरोस, क्रिट आणि सँटोरिनीसारख्या प्रदेशांमध्ये काही सौंदर्यपूर्ण तसेच शाश्र्वतपणे डिझाइन केलेल्या, पूर्णपणे कार्यरत सदनिका आणि व्हिला आहेत. जागतिक नागरिकांसाठी ही उत्तम घरे असतील, असे लेप्टोस इस्टेट्स'चे ग्रुप मार्केटिंग डायरेक्टर संजय सचदेव म्हणाले.दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत १०% ठेव भरल्यास आणि ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत गुंतवणुकीला अंतीम रूप दिल्यास गुंतवणूकदार अजूनही सध्याच्या ए२५०,००० च्या किमान रकमेतंर्गत अर्ज करू शकतात.

## सॅमसंगकडून भारतात नेक्स्ट-जनरेशन एआय इन्व्हर्टर कॉम्प्रेसर असलेले तीन नवीन रेफ्रिजरेटर्स लॉंच

गुरूग्राम, : सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज तीन नवीन रेफ्रिजरेटर्सच्या लॉंचची घोषणा केली, जे ग्राहकांना त्यांच्या निवडी सानुकूल करण्यास मदत करत भारतीय कुटुंबांसाठी स्मार्टर राहणीमानाची खात्री देतात. नवीन रेफ्रिजरेटर्समध्ये सॅमसंगचे नेक्स्ट जनरेशन आर्टिफिशियल इंटेलिजन्स-पॉवर्ड इन्व्हर्टर कॉम्प्रेसर आहे. सॅमसंगच्या नवीन रेफ्रिजरेटर्सचा मुख्य भाग एआय इन्व्हर्टर कॉम्प्रेसर मोटर व ऊर्जा कार्यक्षमता ऑप्टिमाइज करत, तसेच वीजेची बचत करत पारंपारिक अंतर्गत डिझाइनला अधिक आकर्षक करतो.सॅमसंगच्या आठव्या पिढीतील कॉम्प्रेसरमध्ये एआय आहे, जे २७ वर्षांपूर्वी लॉंच करण्यात आलेल्या पहिल्या कॉम्प्रेसरमध्ये क्रांतिकारी परिवर्तनाला सादर करते. एआय इन्व्हर्टर कॉम्प्रेसर सेगमेंट-लीडिंग २० वर्ष वॉरंटीसह येतो, ज्यामधून दीर्घकाळापर्यंत कार्यक्षमता व ऊर्जा कार्यक्षमतेची खात्री मिळते.नवीन एआय रेफ्रिजरेटर्स तीन मॉडेल्समध्ये येतात - क्लीन चारकोल + स्टेनलेस स्टील रंगामध्ये ८०९ लीटर ४-डोअर फ्लेक्स फ्रेंच डोअर बीस्पोक फॅमिली हब' रेफ्रिजरेटर आणि ग्लास फिनिशमधील क्लीन व्हाइट व स्टील फिनिशमधील ब्लॅक केव्हियर रंगामध्ये ६५० लीटर ४-डोअर कन्वर्टिबल फ्रेंच डोअर मॉडेल्स. सॅमसंग बीस्पोक एआयसह होम अप्लायन्सेसच्या नवीन युगामध्ये प्रवेश करत आहे, ज्याअंतर्गत उच्च कार्यक्षम एआय इन्व्हर्टर कॉम्प्रेसर असलेले रेफ्रिजरेटर्स प्रदान करत आहे, जे अपवादात्मक कार्यक्षमता देतात. एआय एनर्जी मोडचा वापर करत ग्राहक जवळपास १० टक्क्यांपर्यंत वीज बचत करू शकतात. सॅमसंग एआय इन्व्हर्टर कॉम्प्रेसर्स आणि संबंधित तंत्रज्ञान विकसित करण्याप्रती कटिबद्ध आहे, ज्यामुळे आमचे रेफ्रिजरेटर्स दीर्घकाळापर्यंत विश्वसनीयता आणि कमी ऊर्जा वापराची खात्री देतात,'' असे सॅमसंग इंडियाच्या डिजिटल अप्लायन्सेस बिझनेसचे वरिष्ठ संचालक सौरभ बैशाखिया म्हणाले.

## मॅगीने १० स्त्रियांना त्यांचे उद्योजकतेचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी केले सक्षम

पुणे : मॅगी अपना फूड बिझनेस या स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वातील विजेत्यांची नावे मॅगीतर्फे जाहीर करण्यात आली आहेत. महत्त्वाकांक्षी कॉंटेण्ट निर्मात्यांना कौशल्ये व ज्ञानाने सुसज्ज करून स्वत:चे फूड चॅनल उभे करण्याची तसेच ते तयार करत असलेल्या आशयातून (कॉंटेण्ट) पैसा मिळवण्याची क्षमता देणे हे या स्पर्धेचे उद्दिष्ट आहे. या पर्वात हा उपक्रम पाककलाविषयक कॉंटेण्ट तयार करणाऱ्या २ कोटी महत्त्वाकांक्षी क्रिएटर्सपर्यंत पोहोचला आणि ५०,००० सहभागी सदस्यांना स्वत:चे ऑनलाइन फूड चॅनल सुरू करण्यासाठी आवश्यक ती कौशल्ये व अनुभव या उपक्रमाद्वारे प्राप्त झाला.

कबिता सिंग (कबिताजकिचन), मधुरा बाचल (मधुराजरेसिपी), तेजा पारुचुरी (विस्मई फूड्स), तनिष्का मुखर्जी (तन्हीर पाकशाला) यांसारख्या भारतातील काही प्रख्यात फूड इन्फ्लुएन्सर्ससोबत तसेच यूट्यूब व मेटाच्या तज्ज्ञांसोबत दोन महिने कसून प्रशिक्षण घेतल्यानंतर १० पात्र विजेत्यांना स्वत:चा कॉंटेण्ट व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रत्येकी ५ लाख रुपयांचे बीज भांडवल प्रदान करण्यात आले. मुंबईच्या सोफिया मचाडो, श्रेया राव, त्राशिका दसेना, अशनीत कौर आनंद व शीतल पेडणेकर, कोलकात्याच्या प्रियंका कुंडु बिस्वास, तिरुअनंतपूरमच्या शैलजा नायर, पुण्याच्या पिंकी दासवानी, गुरूग्रामच्या वंदना जैन आणि मुंबई/हैदराबाद येथील बेनिशा मार्टिन यांनी या प्रतिष्ठेच्या यादीत स्थान मिळवले.नेस्ले इंडियाच्या फूड बिझनेस विभागाचे संचालक रजत जैन या उपक्रमाबद्दल म्हणआले, मॅगी अपना फूड बिझनेसच्या या पर्वातील विजेत्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. गेल्या अनेक वर्षांत मॅगी हा ब्रॅण्ड सक्षमतेचे, नवोन्मेषाचे व पाककलेच्या गौरवाचे प्रतीक म्हणून विकसित झाला आहे. स्वयंपाक करणाऱ्यांचा गौरव करण्याप्रती तसेच त्यांना मदत करण्याप्रती आमच्या बांधिलकीची आणखी एक पावती म्हणजे 'मॅगी अपना फूड बिझनेस' होय. त्यांची स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यात वाटा उचलणे आमच्यासाठी अतीव आनंदाची बाब आहे. मी इंडिया फूड नेटवर्कमधील आमच्या सहयोगींबद्दलही कृतज्ञता व्यक्त करतो. मॅगी अपना फूड बिझनेसच्या अखंडित कार्यान्वयामध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती.गेल्या चार दशकांमध्ये मॅगीने असंख्य भारतीयांचे प्रेम व विश्र्वास कमावला आहे आणि नवोदित शेफ्सच्या पाककलेतील चौकसतेला प्रेरणा दिली आहे. आपल्या विस्तृत उत्पादनश्रेणीच्या माध्यमातून, लोकांच्या दैनंदिन आयुष्यात आनंद आणणारे पदार्थ तयार करण्याची क्षमता, मॅगीने स्वयंपाकी आणि फूडप्रेन्युर्सना दिली आहे. देश के लिए २ मिनिट उपक्रमाचा महत्त्वाचा घटक म्हणून बघितला जाणारा मॅगी अपना फूड बिझनेस अधिकाधिक सशक्त होत आहे. २०हून अधिक उगवत्या कॉंटेण्ट क्रिएटर्ससाठी हे आदर्श व्यासपीठ ठरले आहे. त्यांच्या प्रतिभेची जोपासना करण्यात तसेच नवोन्मेषाला उत्तेजन देण्यात या उपक्रमाने महत्त्वाचा वाटा उचलला आहे.

## ईझीआरएक्सचा पाथ आणि आरोग्य विभाग, सातारा जिल्हा परिषद यांच्यासोबत धोरणात्मक सहयोग

पुणे, : नॉन-इन्व्हेसिव्ह डायग्नोस्टिक सोल्यूशन्समधील आघाडीची नवप्रवर्तक कंपनी असलेल्या ईझीआरक्स ने ना-नफा तत्त्वावर आधारित संस्था पाथ आणि आरोग्य विभाग, सातारा जिल्हा परिषद यांच्यासोबत सहयोग केला आहे. सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिलांना भेडसावणाऱ्या आरोग्यविषयक आव्हानांना सामोरे जाण्यावर विशेष भर देऊन प्राथमिक आरोग्य सेवांना चालना देऊन आयुष्मान भारत कार्यक्रमाला बळकट करण्याचे या धोरणात्मक सहयोगाचे उद्दिष्ट आहे. या सहयोगाचा हेतू या भागातील महिलांमध्ये सक्रिय आरोग्यसेवेला प्राधान्य देण्याबाबत जागरूकता निर्माण करणे आहे. या उपक्रमाचा एक महत्त्वाचा घटक म्हणून, ईझीआरक्स ने साताऱ्यातील आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांना मदत करण्यासाठी आपली चार नाविन्यपूर्ण ईझी चेक उपकरणे उपलब्ध केली आहेत.कंपनीने सातारा जिल्ह्यामधील सामुदायिक आरोग्य अधिकाऱ्यांसाठी २ मे



रोजी सर्वसमावेशक प्रशिक्षण सत्राचे देखील आयोजन केले. या सत्रांना अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुनिल चव्हाण, जिल्हा फार्मसी प्रमुख श्रीमती अपर्णा भिडे, सातारा जिल्हा हॉस्पिटलचे निवासी वैद्यकीय अधिकारी विकास नामदेव वाडगये आणि पाथ व आरोग्य विभाग, सातारा जिल्हा परिषदेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# टाटा मोटर्सकडून अल्ट्रोज रेसर लाँच

मुंबई, : टाटा मोटर्स या भारतातील आघाडीच्या ऑटोमोटिव्ह उत्पादक कंपनीने आज कंपनीच्या प्रीमियम हॅचबॅकची स्पोर्टी अवतार 'अल्ट्रोज रेसर'च्या लाँचची घोषणा केली. अल्ट्रोजमधील कार्यक्षमता पैलूंना १.२ लिटर टर्बो पेट्रोल इंजिनच्या सादरीकरणासह नव्या उंचीवर नेण्यात आले आहे. रेस कार प्रेरित एक्स्टीरिअर व इंटीरिअर लुक, तसेच ५५०० आरपीएममध्ये १२० पीएस शक्ती आणि १७५० ते ४००० आरपीएममध्ये १७० एनएम टॉर्कसह अल्ट्रोजचे हे स्पोर्टी इवॉल्युशन प्रत्येक ड्राइव्हदरम्यान रोमांचक प्रवासाच्या अनुभवाची खात्री देते.सर्वोत्तम वैशिष्ट्ये असलेली रेसर अल्ट्रोजची टॉप ऑफ लाइन व्हर्जन ठरेल. या वेईकलमध्ये ३६० डिग्री कॅमेरा, २६.०३ सेमी इन्फोटेन्मेंट टचस्क्रिन, व्हेण्टिलेटेड सीट्स आणि ६ एअरबॅग्ज (रेसरमध्ये प्रमाणित) अशी सर्वोत्तम वैशिष्ट्ये आहेत. ही ६ स्पीड मॅन्युअल गिअरबॉक्स असलेली एकमेव हॅचबॅक आहे, ज्यामधून शहरातील ट्रॅफिकमध्ये आणि महामार्गांवर उत्तम ड्राइव्हेबिलिटीची खात्री मिळते. सुधारित तंत्रज्ञान, वैशिष्ट्ये आणि हॅचबॅकमधील दर्जात्मक सुरक्षितता वैशिष्ट्यांसह अल्ट्रोज रेसर तीन रंगांच्या पर्यायांसह (प्युअर ग्रे, अॅटोमिक ऑरेंज व अव्हेन्यू व्हाइट) ३ व्हेरिएण्ट्समध्ये (आर१, आर२ व आर३) उपलब्ध असेल. तसेच, अल्ट्रोज लाइन अपमध्ये अधिक भर करत टाटा मोटर्सने आपल्या अल्ट्रोज श्रेणीमध्ये दोन नवीन व्हेरिएण्ट्स (एक्सझेल लक्स व एक्सझेड+ एस लक्स) आणि एक अपग्रेडेड व्हेरिएण्ट (एक्सझेड+ओएस) देखील लाँच केले आहे. हे दोन नवीन अतिरिक्त व्हेरिएण्ट्स पेट्रोल मॅन्युअल, पेट्रोल डीसीए, डिझेल आणि सीएनजी पॉवरट्रेन्स पर्यायांमध्ये उपलब्ध असतील.

टाटा अल्ट्रोज रेसरच्या लाँचबाबत मत व्यक्त करत टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटी लि.चे चीफ कमर्शियल ऑफिसर श्री. विवेक श्रीवत्स म्हणाले, अल्ट्रोज लाइन अप प्रबळ करत आम्हाला अल्ट्रोज रेसर लाँच करण्याचा आनंद होत आहे. ही कार प्रवाशांच्या दैनंदिन ड्राइव्हमध्ये उत्साहाची भर करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. या कारमधील उच्च पॉवर आऊटपुटसह विभागातील अग्रणी वैशिष्ट्ये आणि तंत्रज्ञान-केंद्रित दृष्टिकोन रेसरला कनेक्टेड व फॅशन फॉरवर्ड असलेल्या आणि त्यांना वरचढ ठरवणारी कार ड्राइव्ह करण्याची इच्छा असलेल्या आधुनिक काळातील ग्राहकांसाठी हवीहवीशी बनवतात. आम्हाला विश्वास आहे की, कार्यक्षमता केंद्रित डीएनए आणि रेस कार प्रेरित लुकसह ही कार परिपूर्ण सोबती ठरेल, जी तुम्हाला RacePastTheRoutine ची भावना देईल.''

# सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचा एमएसईडीसीएल सोबत सामंजस्य करार

पुणे, : सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ सस्टेनेबिलिटी स्टडीजने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (एमएसईडीसीएल) सोबत सामंजस्य करार केला आहे.या सामंजस्य करारावर महावितरणच्या पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.राजेंद्र पवार आणि सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या प्र - कुलपती डॉ. स्वाती मुजुमदार यांनी स्वाक्षरी केली. याप्रसंगी सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. राजेश इंगळे, समन्वयक उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी व स्कूल ऑफ सस्टेनेबिलिटी स्टडीजचे प्राध्यापक डॉ. महेश वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.हा सामंजस्य करार उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील दरी कमी करणारा आहे.या सामंजस्य करारामुळे एसएसपीयु मधील विद्यार्थ्यांना सुरक्षितता आणि उद्योगातील इतर बाबी समजून घेता येणार आहेत. या करारामुळे विद्यार्थ्यांना इंटर्नशिपच्या संधींचा आणखी एक मार्ग खुला झाला आहे.याप्रसंगी बोलताना महावितरणच्या पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.राजेंद्र पवार म्हणाले की, महावितरणची महाराष्ट्र राज्यात २५ जिल्हा प्रशिक्षण केंद्रे आणि ४ प्रादेशिक केंद्रे आहेत. सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी आणि महावितरण यांच्यातील करार हा दोन्ही संस्थांना परस्पर लाभदायक ठरेल,असेही त्यांनी नमूद केले.

# मूव्ह तर्फे 'मूव्ह कूल' सादर

पुणे,: भारतातील अग्रगण्य वेदना निवारण ब्रँड,मूव्हने 'मूव्ह कूल' हे कोल्ड थेरपीने प्रेरित क्रांतिकारक अशी नवकल्पना असलेले उत्पादन सादर केले आहे. मेन्थॉलच्या कूलिंग पॉवरसह, नवीन उत्पादन सक्रिय जीवनशैलीशी संबंधित जखम, मोच, ताण आणि स्नायू दुखणे यामुळे स्नायू आणि सांधेदुखीपासून आराम देण्यासाठी डिझाइन केले आहे.

डिसेंबर २०२१ मध्ये करण्यात आलेल्या रेकिट पेन इंडिया डीसीजी डिमांड सर्व्हे नुसार, भारतातील ४००० हून अधिक उत्तरदात्यांमधील जवळपास ८% लोकांनी सांगितले की त्यांच्या वेदनांच्या घटना खेळ किंवा व्यायामाशी संबंधित आहेत. मूव्ह कूल फिटनेस-संबंधित दुखापतींना संबोधित करते, ज्यामध्ये स्नायू दुखणे, मोच आणि ताण येतात. मेन्थॉलद्वारे समर्थित, मूव्ह कूल बर्फासारखी शीतल संवेदना प्रदान करते* जे प्रभावित क्षेत्राला सुन्न करण्यास मदत करते आणि १५ सेकंदात कार्य करण्यास सुरवात करते.

मूव्ह कूल भारतभरातील सर्व आघाडीच्या ऑफलाइन आणि ऑनलाइन रिटेल स्टोअरमध्ये जेल आणि स्प्रे, अशा वापरण्यास सोयीस्कर दोन स्वरूपांमध्ये उपलब्ध आहे. रेंजमध्ये १० ग्राम आणि २० ग्राम जेलचा समावेश आहे ज्याची किंमत ६० रुपये आणि अनुक्रमे ११० रुपये आणि स्प्रे मध्ये ८५ रुपये मध्ये १५ ग्राम आणि १८६ रुपयांमध्ये ३५ ग्राम समाविष्ट आहे.

# निमेशन क्षेत्रात 'एआय'चा वापर अनिवार्य असून त्यातून रोजगारात वाढ होईल

पुणे, : अन्य तांत्रिक क्षेत्रांबरोबरच आता निमेशन (सचेतन चित्र) क्षेत्रातही 'एआय' (कृत्रिम बुद्धिमत्ते) चा वापर आता अनिवार्य होत असून 'एआय'सह निमेशन निर्मितीचे प्रशिक्षण सुरू करत असल्याचे अनुभवी निमेशनतज्ज्ञ आणि टोड्स टेक्नोलॉजी ऑफ डेव्हलपमेंटचे संस्थापक-संचालक गणेश रेशवाल यांनी त्यांच्या पुण्यातील पहिल्या निमेशन प्रशिक्षण स्टूडिओच्या उद्घाटन प्रसंगी सांगितले. 'एआय'मुळे निमेशन क्षेत्रातील रोजगार कमी होणार नसून त्याचे स्वरूप बदलल्यामुळे या क्षेत्रातील कौशल्य प्राप्त केलेल्यांसाठी मोठा वाव निर्माण होणार असून स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.मुंबईपाठोपाठ आता पुणेही निमेशन स्टूडिओ आणि प्रशिक्षणाचे केंद्र बनत असून रेशवाल यांच्या घोले रोड येथील स्टूडिओचे औपचारिक उद्घाटन त्याचे वडील शिवलाल आणि मातोश्री पुनाबाई रेशवाल यांनी शुभाशिर्वाद देऊन केले. यावेळी या प्रशिक्षण स्टूडिओचे प्रमूख रवींद्र पाटील, निर्मिती व्यवस्थापक राजेश खेले तसेच निमेशन क्षेत्रातील अनेक दिग्गज, व्यावसायिक, प्रशिक्षक व अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.याप्रसंगी बोलताना रेशवाल म्हणाले की, निमेशन या दृश्यनिर्मितीच्या माध्यमात सृजनशक्तीला अधिक वाव मिळावा यासाठी 'एआय'चे टूल आणि तंत्रज्ञान मोठी क्रांती करेल. अशावेळी 'एआय'ला घाबरून न जाता या तंत्राशी स्वत:ला जोडता आले पाहिजे. यातून निमेशन निर्मितीतील सृजनशीलतेबरोबर कार्यक्षमतेत वाढ वेळेतही मोठी बचत होईल. या साऱ्याची आज निमेशन क्षेत्रातील व्यावसायिक सफाईसाठी आवश्यकता आहे. प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना यासाठी निमेशन क्षेत्रासाठी तयार करण्यात आलेली नवनवीन 'एआय' टूल्स वापरता येणार आहेत. यातून विद्यार्थ्यांच्या मनातील आत्मविश्र्वास वाढीस लागेल.'एआय'च्या वापरासह सध्या निमेशन निर्मितीसह व्हीएफएक्स, गेमिंग, ग्राफिक्स आणि यूआययूएक्स या क्षेत्रात रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होत असून आपल्या प्रशिक्षण संस्थेतर्फे या नव्याने विकसित होणाऱ्या क्षेत्रांसाठी लागणारे प्रशिक्षणही देणार असल्याचे रेशवाल यांनी सांगितले.

# केईएम हॉस्पिटल पुणे तर्फे डेव्हलपमेंटल असेसमेंट स्केल्स फॉर इंडियन इनफंट्स कार्यशाळा संपन्न

पुणे, : केईएम हॉस्पिटल पुणे तर्फे नुकतेच बेली स्केलचे भारतीय रूपांतर असलेल्या डेव्हलपमेंटल असेसमेंट स्केल्स फॉर इंडियन इनफंट्स (डीएएसआयआय) या विषयावर सहा दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. बौद्धिक, मानसिक विकासाचे मूल्यांकन करण्यासाठी ही योग्य मूल्यांकन पद्धती असून जन्मापासून ते ३० महिन्यांपर्यंतच्या कालावधीत केली जाते. ज्या मुलांची मानसिक - शारीरिक वाढ अपेक्षेप्रमाणे होत नाही त्यांसाठी ही मूल्यांकन पद्धती योग्य आहे.ही बुद्ध्यांक मूल्यांकन पद्धती १ महिना ते ३० महिने वयोगटातील बाळांच्या विकासात्मक वाढीबाबत माहिती देते. तसेच मानसिक व शारीरिक विकासाच्या विविध पैलूंचे मूल्यांकन करण्यातही मदत करते. यामुळे विकासात्मक समस्यांचे लवकर निदान होऊ शकते .

# सॅमसंगकडून क्वांटम डॉट फिचर, ४के अपस्केलिंग असलेली २०२४ क्यूएलईडी ४के प्रीमियम टीव्ही सिरीज लाँच, किंमत ६५,९९० रूपयांपासून

गुरूग्राम, - सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज भारतात २०२४ क्यूएलईडी ४के टीव्ही सिरीज लाँच केली, जिची किंमत ६५,९९० रूपयांपासून सुरू होते. २०२४ क्यूएलईडी ४के टीव्ही लाइन-अपमध्ये अनेक प्रीमियम वैशिष्ट्ये आहेत.२०२४ क्यूएलईडी ४के टीव्ही ५५ इंच, ६५ इंच आणि ७५ इंच या तीन आकारांमध्ये येईल. ही टीव्ही सिरीज आजपासून ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सर्सह डर्ग्गिपस.लो आणि Amazon.in वर उपलब्ध आहे.

क्वांटम प्रोसेसर लाइट ४के ची शक्ती असलेली २०२४ क्यूएलईडी ४के टीव्ही सिरीज क्वांटम डॉट आणि क्वांटम एचडीआरसह १०० टक्के कलर व्हॉल्यूम देते. या सिरीजमध्ये ४के अपस्केलिंग देखील आहे, जे वापरकर्त्यांना हाय-रिझॉल्यूशन ४के कन्टेन्टचा आनंद देते. तसेच क्यू-सिम्फोनी साऊंड टेक्नॉलॉजी, ड्युअल एलईडी, गेमिंगसाठी मोशन एक्सेलरेटर आणि ग्राहकांसाठी कलर फिडेलिटीचे विश्वसनीय प्रतीक पॅण्टोन व्हॅलिडेशन अशी सर्वोत्तम वैशिष्ट्ये आहेत.''गेल्या काही वर्षांमध्ये कन्टेन्ट पाहण्याच्या पद्धतीमध्ये झपाट्याने बदल झाला आहे, जेथे वापरकर्ते अधिक सर्वोत्तम व प्रीमियम व्युइंग अनुभवाची मागणी करत आहेत. या मागणीची पूर्तता करण्यासाठी आम्ही २०२४ क्यूएलईडी ४के टीव्ही सिरीज लाँच केली आहे, जी प्रीमियम व उत्साहित व्युइंग अनुभव विश्वातील आधारस्तंभ आहे. नवीन टीव्ही सिरीज वास्तविक पिक्चर क्वॉलिटीसह ४के अपस्केलिंग वैशिष्ट्य देते, जे स्क्रिनवरील कन्टेन्टला जवळपास ४के लेव्हल्सपर्यंत बदलण्यासह एकूण व्युइंग अनुभवाला नव्या उंचीवर घेऊन जाते,'' असे सॅमसंग इंडियाच्या व्हिज्युअल डिस्प्ले बिझनेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहनदीप सिंग म्हणाले.

उद्योग मानकांच्या पुढे जात २०२४ क्यूएलईडी ४के टीव्ही सिरीजमध्ये शक्तिशाली प्रोसेसर क्वांटम प्रोसेसर लाइट ४के आहे, जे व्युइंग व साऊंड स्थितींना सानुकूल करते. तसेच, क्वांटम एचडीआर वैशिष्ट्य सिनेमॅटिक स्केलमध्ये कॉन्ट्रास्टची व्यापक श्रेणी देते.

# लेनोव्हो तर्फे भारतातील गेमर्ससाठी एंड - टू- एंड डेस्कटॉप कस्टमायझेशन

पुणे,: आघाडीची तंत्रज्ञान कंपनी असलेल्या लेनोव्हो ने गेमिंग ग्राहकांसाठी एंड - टू- एंड कस्टमायझेशनचा पर्याय देत डेस्कटॉप कॉम्प्युटर्समध्ये एक नवीन मानक स्थापन केले आहे. ब्रँड तर्फे गेमिंग डेस्कटॉपवर सर्व स्तरावरील सानुकूलता प्रदान करत आहे,ज्यामुळे वापरकर्त्यांना त्यांच्या विशिष्ट गरजा आणि प्राधान्यानुसार संगणकीय अनुभव घेता येईल.ग्राहकांना लिजन आणि एलओक्यू गेमिंग,डेस्कटॉप्स अपग्रेड करता येतील.वापरकर्त्यांना विविध प्रकारचे कस्टमायझेशन पर्याय उपलब्ध आहेत.ते खालील प्रमाणे : सुधारित कार्यक्षमतेसह नवीनतम इंटेल आय७ १४ जनरेशन पर्यंत प्रोसेसर अपग्रेड

सुधारित मल्टीटास्किंग क्षमतेसाठी ३२ जीबीपर्यंत मेमरी अपग्रेड

# दअनस्टॉपेबल टीवीएस ने महाराष्ट्रात अपाचे आरटीआर १६० सिरीजची नवीन ब्लॅक एडिशन लाँच करून धमाल उडवली आहे

पुणे, : दुचाकी आणि तीनचाकी विभागात कार्यरत आघाडीची जागतिक वाहन निर्माता कंपनी टीवीएस मोटर कंपनी (टीवीएसएम) - आज टीवीएस अपाचे १६० सिरीज मोटारसायकलचे 'ए ब्लेझ ऑफ ब्लॅक' डार्क एडिशन महाराष्ट्रात लॉन्च केले आहे. टीवीएस अपाचे आरटीआर १६० आणि आरटीआर १६० ४वी अशा या बाईक्स आहेत. अपाचे आरटीआर १६० ४वी ही भारतातील सर्वात शक्तिशाली १६०लल ऑइल कूल्ड मोटरसायकल आहे जी १७.६ पीएस९२५० पॉवर देते. या दोन्ही मोटारसायकलमध्ये तीन राइड मोड, डिजिटल एलसीडी क्लस्टर, एलईडी हेडलॅम्प, टेललॅम्प आणि ऋद्धढ यासह सर्वोत्कृष्ट-इन-सेगमेंट कामगिरी आदी वैशिष्ट्ये आहेत.



सेगमेंट फर्स्ट राइड मोड्स हे इंजिन आणि एबीएस मोडचे संयोजन आहेत जे ३ मोड देतात - स्पोर्ट, अर्बन आणि रेन जे वेगवेगळ्या राइडिंग वातावरणासाठी तयार केलेले आहेत.

६० हून अधिक देशांमध्ये टीवीएस चा चांगलाच विस्तार आहे. यामुळेच टीवीएस अपाचे हा जगातील सर्वात वेगाने वाढणारा स्पोर्ट्स मोटरसायकल ब्रँड बनला आहे. रेसिंग डीएनए समोर ठेवून तयार करण्यात आलेली टीवीएस ची ही मालिका तिच्या लूक्सपासूनच स्वतःचे वेगळेपण जपते आणि सिद्ध करते. तिची कामगिरी, डिझाइन, तंत्रज्ञानापासून ते त्याच्या रचनेपर्यंत सारेच अनोखे आहे. यात रायडरची सुरक्षितता आणि आराम यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. ट्रॅक टू रोड तत्त्वज्ञानाभोवती तयार आणि विकसित केलेल्या, टीवीएस अपाचे मालिकेमुळे रेसिंगमध्ये सर्वांना सहभागी होण्यास मदत केली आहे. तिच्या या वैशिष्ट्यामुळेच टीवीएस अपाचे आता केवळ उत्पादन राहिलेले नाही तर ग्राहकांसाठी तो एक महत्त्वाकांक्षी मोटरसायकल ब्रँड झाला आहे.

# केईएम हॉस्पिटल पुणे तर्फे मल्टिडिसिप्लिनरी मेडिकल जेनेटिक्स विभाग सुरू

पुणे : केईएम हॉस्पिटल पुणे तर्फे मल्टिडिसिप्लिनरी मेडिकल जेनेटिक्स विभाग सुरू करण्यात आला आहे.हा अशा प्रकारचा शहरातील पहिला विभाग आहे. या विभागामध्ये रिप्रॉडक्टिव्ह जेनेटिक्स (प्रजनन अनुवांशिक शास्त्र),कॅन्सर जेनेटिक्स (कर्करोग अनुवांशिक शास्त्र) ,न्यूरो जेनेटिक्स (मेंदूविकार अनुवांशिक शास्त्र) आणि नेफ्रो जेनेटिक्स (मूत्रविकार अनुवांशिक शास्त्र) यांचा समावेश आहे. या विभागामध्ये एकाच छताखाली सर्व प्रकारच्या प्रयोगशाळा चाचण्या व अनुवांशिक शास्त्रसंदर्भात समुपदेशन सेवा उपलब्ध होतील. केईएम हॉस्पिटल पुणे चे वैद्यकीय संचालक झक्सेस कोयाजी, प्रसूती व स्त्रीरोग शास्त्र विभागाचे संचालक व कन्सल्टंट डॉ. व्ही एम जोशी आणि रुग्णालयाच्या टीममधील इतर सदस्यांच्या उपस्थितीत मेडिकल जेनेटिक्स विभागाचे उद्घाटन करण्यात आले.

या विभागामध्ये अनुवंशशास्त्रज्ञ (जेनेटिसिस्ट ) डॉ. मीनल अग्रवाल, डॉ. चैतन्य दातार आणि डॉ. मनीषा डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष सेवांचा समावेश करण्यात आला आहे. तीन विशेष अनुवंशशास्त्रज्ञांसह स्थापन झालेल्या बहुआयामी मेडिकल जेनेटिक्स विभागामुळे केईएम हॉस्पिटल ने देशातील काही निवडक हॉस्पिटल्सच्या यादीत स्थान मिळवलेआहे.



# शहरातील डासोत्पत्ती ठिकाणांवर महापालिकेच्या वतीने कारवाई

पिंपरी :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य व वैद्यकीय विभागाने शहरातील विविध ठिकाणी डास उत्पत्ती स्थानांची पाहणी करून डासांच्या अळया आढळलेल्या ठिकाणांच्या जागा मालकांवर आणि संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली आहे. १ जून २०२४ पासून सुरू असलेल्या या कारवाईमध्ये १५६ आस्थापनांना नोटीस बजावण्यात आली आहे. तर आतापर्यंत एकूण १० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला असल्याची माहती आरोग्य व वैद्यकीय विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

किटकजन्य आजारांना आळा घालण्यासाठी शहरात विविध उपाययोजना करण्यात येत असून औद्योगिक, बांधकाम आस्थापना, कार्यालये, गृहसंस्था, घरे तसेच व्यावसायिक दुकानांसह सर्व आस्थापनांनी आपल्या ठिकाणी असलेली डास उत्पत्ती स्थळे तात्काळ नष्ट करावीत, अन्यथा कठोर कारवाई केली जाईल असा इशाराही देण्यात आला आहे.डेंग्यू, चिकुणगुण्या, मलेरिया अशा किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध भागांची तपासणी करून नोटीस बजावण्याची कारवाई महापालिकेने मोठ्या प्रमाणात सुरू केली आहे.शहरात डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेच्या तपासणी पथकातील कर्मचारी तपासणीसाठी आल्यास त्यांना नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहनही महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# ओपन हार्ट सर्जरी न करता बदलली रक्त वाहिनीची झडप

पुणे पिंपरी : डीपीयु सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी पुणे येथे नुकतेच ढ-तख आणि वॉल्व क्लिनिक सुरु करण्यात आले आहे . अद्ययावत वैद्यकीय तंत्रज्ञानानात अग्रेसर ट्रान्सकॅथेटर ओर्टिक वॉल्व इम्पांटेशन (टावी) ही प्रक्रिया अत्याधुनिक आहे. या प्रक्रियेद्वारे हृदयाला कुठलाही चिरा न देता, ओपन हार्ट सर्जरी न करता हृदयातून अन्य अवयवांना रक्तपुरवठा करणारी शुद्ध रक्तवाहिनी (ओर्टा) मधील वॉल्व (झडप) बदलविण्याची प्रक्रिया नुकतीच पिंपरी येथील डीपीयु सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे ८३ वर्षीय रुग्णावर करण्यात आली. ही या हॉस्पिटलमधील पहिलीच प्रक्रिया होती. मुख्य म्हणजे पूर्वी ही प्रक्रिया करण्यास ओपन हार्ट सर्जरी शिवाय पर्याय नव्हता. त्यामुळे वयस्क व सहव्याधी (कोमॉर्बिडिटी) असलेल्या रुग्णांवर ही प्रक्रिया शक्य नव्हती. या प्रक्रियेसह आता टावी व स्ट्रक्चरल हार्ट स्पेशलिस्ट, डीपीयु सुपरस्-पेशालिटी हॉस्पिटल ढ-तख आणि वॉल्व्ह स्पेशलिटी क्लिनिकचे संचालक डॉ. अनमोल सोनावणे यांनी डीपीयु सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या सहकार्याने ‘वॉल्व्ह क्लिनिक’ला सुरुवात केली आहे. हे क्लिनिक पुणे व पिंपरी शहरातील रुग्णांना हृदयविकाराच्या अत्याधुनिक उपचारासाठी प्रत्येक सोमवारी उपलब्ध असेल.




८३ वर्षीय रुग्ण चार महिन्यांपासून दम लागणे, श्र्वास भरून येणे, पायावर सुज अशा हृदयविकाराच्या लक्षणांनी सहा महिन्यांपासून ग्रस्त होता. त्यांच्या शुद्ध रक्तवाहिनीची झडप (ॲओर्टिक वॉल्व) बंद झाल्याने रक्तप्रवाहास अडथळा निर्माण झाला होता. विविध चाचण्या केल्यानंतर डॉ. अनमोल सोनावणे यांनी त्यांना वॉल्व बदलविण्याचे सुचविले. वय हे एक महत्त्वाचे फॅक्टर बघता ‘ट्रान्सकॅथेटर ॲओर्टिक वॉल्व इम्पांटेशन’ प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला व कुठलीही चिरफाड न करता, हृदयावर शस्त्रक्रिया न करता वॉल्व बदलण्याची प्रक्रिया केली. रुग्णाला एक-दोन दिवसांनी इस्पितळातून सुटी देण्यात आली. आता ‘ओपन हार्ट सर्जरी’द्वारे चिरफाड न करता देखील गुंतागूंतीची झडप बदलण्याची शस्त्रक्रिया आता डीपीयुमध्ये शक्य होत आहे.

# सूर्या मदर अँड चाईल्ड हॉस्पिटलची ’दूध दान जागरूकता’ मोहिम




पुणे,: नवजात बालके आणि लहान मुलांसाठी स्तन दूध हा पोषणाचा प्राथमिक व सर्वोच्च स्रोत असतो. बाळाच्या निरोगी वाढीसाठी स्तन दूध आवश्यक असते, त्यामुळे बाळाचे संसर्ग आणि आजारांपासून रक्षण होते. स्तन दूध उपलब्ध नसल्यास दात्याकडून दिले गेलेले दूध हा बाळासाठी दुसरा उत्तम पर्याय असतो. खासकरून नऊ महिने पूर्ण होण्याआधी जन्मलेली बालके किंवा गंभीर आजारी असलेल्या बाळांसाठी हे दूध खूप उपयुक्त ठरते. सूर्या मदर अँड चाईल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने स्तन दूध दान जागरूकता मोहिमेचे आयोजन केले होते. पुण्यातील सूर्या हॉस्पिटलच्या परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाची थीम दान करण्यात आलेल्या प्रत्येक थेंबामध्ये प्रेम, मिळालेल्या प्रत्येक थेंबामध्ये जीवन. या मोहिमेचे उद्घाटन लॅक्टेशन कन्सल्टन्ट डॉ मनिषा खलाने यांनी केले. स्तन दूध दानाचे महत्त्व अधोरेखित करत दूध दान करणाऱ्या मातांचे कौतुक त्यांनी आपल्या भाषणात केले.

बाळाला जन्मापासून पहिल्या सहा महिन्यांपर्यंत आवश्यक असलेली सर्व पोषके, फॅट्स, कर्बोदके, प्रथिने, जीवनसत्त्वे, खनिजे आणि पाणी हे सर्व घटक स्तन दुधामध्ये मुबलक प्रमाणात असतात. एनएफएचएसच्या अहवालानुसार, फक्त भारतामध्ये फक्त ४३% बाळांना पहिले सहा महिने फक्त स्तन दूध पाजले जाते. हार्मोनल समस्या किंवा प्रसुतिनंतर झालेला संसर्ग यामुळे काही मातांना दूध येत नाही. ज्या बाळांना त्यांच्या आईकडून स्तन दूध मिळू शकत नाही, ती बाळे आजारी असतील किंवा नऊ महिने पूर्ण होण्याआधीच जन्मलेली असतील तर त्यांच्यासाठी स्तन दूध दान हा पोषणाचा निरंतर स्रोत ठरू शकतो.

दूध दान जागरूकता मोहिमेमध्ये ६७५ पात्र दाता मातांनी उस्फुर्तपणे भाग घेतला होता. या मोहिमेमध्ये सूर्या मदर अँड चाईल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने ५२७ लिटर ९८४ मिली दूध दाता मातांकडून जमा केले, त्यामुळे हॉस्पिटलला ५२५ बाळांना पोषण पुरवण्यात मदत होईल.डॉ अमिता कौल यांनी स्तन दूध दान करणाऱ्या मातांप्रती मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली.

# निमेशन क्षेत्रात ‘एआय’चा वापर अनिवार्य असून त्यातून रोजगारात वाढ होईल

पुणे, : अन्य तांत्रिक क्षेत्रांबरोबरच आता निमेशन (सचेतन चित्र) क्षेत्रातही ‘एआय’ (कृत्रिम बुद्धिमत्ते) चा वापर आता अनिवार्य होत असून ‘एआय’सह निमेशन निर्मितीचे प्रशिक्षण सुरू करत असल्याचे अनुभवी निमेशनतज्ज्ञ आणि टोड्स टेक्नोलॉजी ऑफ डेव्हलपमेंटचे संस्थापक-संचालक गणेश रेशवाल यांनी त्यांच्या पुण्यातील पहिल्या निमेशन प्रशिक्षण स्टूडिओच्या उद्घाटन प्रसंगी सांगितले. ‘एआय’मुळे निमेशन क्षेत्रातील रोजगार कमी होणार नसून त्याचे स्वरूप बदलल्यामुळे या क्षेत्रातील कौशल्य प्राप्त केलेल्यांसाठी मोठा वाव निर्माण होणार असून स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

मुंबईपाठोपाठ आता पुणेही निमेशन स्टूडिओ आणि प्रशिक्षणाचे केंद्र बनत असून रेशवाल यांच्या घोले रोड येथील स्टूडिओचे औपचारिक उद्घाटन त्याचे वडील शिवलाल आणि मातोश्री पुनाबाई रेशवाल यांनी शुभाशिर्वाद देऊन केले. यावेळी या प्रशिक्षण स्टूडिओचे प्रमूख रवींद्र पाटील, निर्मिती व्यवस्थापक राजेश खेले तसेच निमेशन क्षेत्रातील अनेक दिग्गज, व्यावसायिक, प्रशिक्षक व अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.याप्रसंगी बोलताना रेशवाल म्हणाले की, निमेशन या दृश्यनिर्मितीच्या माध्यमात सृजनशक्तीला अधिक वाव मिळावा यासाठी ‘एआय’चे टूल आणि तंत्रज्ञान मोठी क्रांती करेल. अशावेळी ‘एआय’ला घाबरून न जाता या तंत्राशी स्वतःला जोडता आले पाहिजे.

# टाटा मोटर्स पॅसेंजर वेईकल्सच्या विक्रीमध्ये ५ वर्षांत ४ पट वाढ

पुणे, - टाटा मोटर्स या भारतातील आघाडीच्या ऑटोमोबाइल उत्पादक कंपनीने आर्थिक वर्ष २४ मध्ये ग्रामीण क्षेत्रांतील विक्रीत प्रभावी कामगिरी केली, जेथे कंपनीच्या एकूण पॅसेंजर वेईकल्स विक्रीत ४० टक्क्यांचे योगदान दिले. टाटा मोटर्सच्या कार्स व एसयूव्हींच्या न्यू फॉरेव्हर श्रेणीची लोकप्रियता ग्रामीण ग्राहकांमध्ये देखील वाढली आहे, ज्यामध्ये ७० टक्के ग्राहक पहिल्यांदाच कार खरेदीदार आहेत. वाढत्या पायाभूत सुविधा, डिजिटल उपलब्धता आणि खरेदी क्षमतेसह ग्रामीण व शहरी ग्राहकांच्या महत्त्वाकांक्षांमधील तफावत कमी होत आहे.टाटा कार्स व एसयूव्ही ऑफरिंग्जची प्रबळ न्यू फॉरेव्हर श्रेणी विविध पॉवरट्रेन पर्यायांमध्ये (पेट्रोल, डिझेल, सीएनजी व ईव्ही) उपलब्ध आहे, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या गरजांशी अनुकूल उत्तम पर्यायाची निवड करण्याची सुविधा मिळते.

# टीजीएच ऑन्को लाइफ कॅन्सर सेंटर येथे एआय-तंत्रज्ञानाचा वापर करून फुफ्फुस आणि प्रोस्टेट कर्करोगाने पिडीत रुग्णांवर यशस्वीरित्या उपचार

पुणे : महाराष्ट्रात प्रथमच या तंत्रज्ञानाचा वापर करुन कर्करोगावर केली मात पुणे, १२ जून २०२४ : टीजीएच- ऑन्को लाइफ कॅन्सर सेंटरने फुफ्फुसाचा कर्करोग असलेले ७० वर्षीय रुग्ण (पुरुष) आणि प्रोस्टेट कर्करोगाने पिडीत ६२ वर्षीय पुरुष रुग्णावर एआय तंत्रज्ञानाचा वापर करुन यशस्वी उपचार केले. महाराष्ट्रात कॅन्सरच्या अचूक उपचारासाठी प्रथमच आर्टिफिशियल इंटेलिजेंन्सवर आधारीत सिंक्रोनी ऑटोमॅटिक, रिअल-टाइम मोशन सिंक्रोनाइझेशन तंत्रज्ञानाचा वापर करुन यशस्वी उपचार करण्यात आला आहे. एआय-आधारित रेडीएशन उपचार पद्धतीचा अवलंब करून, दोन्ही रुग्णांनी कर्करोगावर यशस्वी मात केली आहे.



आज पत्रकार परीषदेदरम्यान याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली याप्रसंगी डॉ. अभिषेक पुरकायस्थ, डाॅ.ज्योती मेहता, सचिन देशमुख, कार्यकारी संचालक, डाॅ.संतोष साहू आणि रूग्ण अनंतराव राईकर उपस्थित होते. ७० वर्षीय रुग्ण श्री अनंतराव रायकर, तळेगाव, पुणे येथील रहिवासी, ज्यांना दैनंदिन कामात श्र्वासोच्छवासाचा त्रास होत होता, त्यांनी अनेक तज्ञांची मदत घेतली, परंतु त्यांना यश आले नाही. सुरुवातीला, सीटी स्कॅन आणि नंतर संपूर्ण शरीराचे पेट स्कॅन केले गेले ज्यामध्ये त्यांच्या डाव्या बाजूच्या फुफ्फुसात कर्करोगजन्य गाठ आढळून आली. बायोप्सीने फुफ्फुसाच्या कार्सिनोमाच्या निदान झाले. त्यांच्यावर सुरूवातीला पॅलेटीव्ह केमोथेरपी आणि त्यानंतर टार्गेटेड थेरपीने उपचार करण्यात आला परंतू पुन्हा केलेल्या पेट स्कॅनमध्ये आजार लिम्फ नोडमध्ये प्रगत अवस्थेत असल्याचे दिसून आले आणि त्यामुळे रूग्णाला अधिक त्रास जाणवू लागला. दुसऱ्या प्रकरणात सोलापूर येथील ६२ वर्षीय पुरुषाला मागील एका महिन्यापासून मूत्रमार्गासंबंधीत समस्या उद्भवू लागल्या होत्या.

# सीग्रामच्या रॉयल स्टॅगचे आयसीसीचे ऑफिशियल सपोर्टर म्हणून भागीदारीचे नूतनीकरण

पुणे,: सीग्रामच्या रॉयल स्टॅगने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद सोबतचे आपले सहकार्य आणखी चार वर्षांसाठी वाढवले आहे, ज्यामुळे ब्रँडची क्रिकेट आणि खेळाच्या जागतिक चाहत्यांप्रती असलेली वचनबद्धता आणखीनच दृढ झाली आहे. २०२७ च्या अखेरीपर्यंत चालणारी ही भागीदारी रॉयल स्टॅगचा अधिकृत सहाय्यक म्हणून दर्जा वाढवेल आणि याची सुरुवात वेस्ट इंडीज आणि युएसए मधील आयसीसी पुरुषांच्या टी २० विश्र्वचषकापासून होईल.२०१८ आणि २०२३ दरम्यान आयसीसी सोबत ब्रँड यशस्वीपणे पाच वर्षांची भागीदारी राहील्यानंतर ही वाढ केल्या गेली. रॉयल स्टॅगसाठी क्रिकेट हा नेहमीच ग्राहकांच्या सहभाग घेण्यासाठी एक महत्त्वाचा आधारस्तंभ राहिला आहे आणि ब्रँडचा आयसीसी आणि रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह आणि सुर्यकुमार यादव यांसारख्या जगातील सर्वोत्तम क्रिकेटपटूंसोबतच्या सततच्या सहवासामुळे देशभरातील लाखो क्रिकेट चाहत्यांना हा ब्रँड आवडण्यास मदत झाली आहे.

# हृदयस्पर्शी स्वागताने ’सूर्यदत्त’मधील विद्यार्थी भारावले शाळेचा पहिला दिवस केवळ औपचारिक परिचय नव्हे

## शाळेचा पहिला दिवस केवळ औपचारिक परिचय नव्हे, तर आनंदमय सोहळा : प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया

पुणे : शिक्षकांनी औक्षण, पाद्यपूजन करत विद्यार्थ्यांच्या गळयात मोत्यांच्या माळा घालत केलेल्या हृदयस्पर्शी स्वागताने बावधन येथील सूर्यदत्त नॅशनल स्कुलमधील विद्यार्थी भारावून गेले. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. पारंपारिक स्वागताची सुरुवात शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी नम्रतेने, आदराच्या भावनेने विद्यार्थ्यांचे पाय धुऊन केली. या कृतीने मुलांना पवित्रता व निरागसतेचे स्वरूप कृतीतून दिसून आले.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, मुख्याध्यापिका शीला ओक यांच्या मार्गदर्शनाखाली या स्वागत



सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पाद्यपूजन, कपाळावर टिळा लावून विद्यार्थ्यांचे आवारात स्वागत केले. भारतीय संस्कृतीमध्ये हा क्षण शुभ प्रसंग, आशीर्वाद, समृद्धी व कल्याण याचे दर्शन घडवतो. यातून विद्यार्थ्यांमध्ये आपल्या संस्कृती, परंपरा याविषयी जाणीव होण्यासह आपुलकीची व सुसंवादाची भावना निर्माण होते.प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, शाळेतील पहिला दिवस म्हणजे केवळ औपचारिक परिचय नाही; तर आनंद सोहळा आहे. शैक्षणिक प्रवासाचे संगोपन आणि समृद्ध करण्याची सुरवात आहे. सांस्कृतिक परंपरा स्वीकारून, पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक आरोग्याचे मौल्यवान धडे देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हा स्वागत सोहळा महत्वपूर्ण ठरतो. यातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासह आदर, जबाबदारी आणि लवचिकतेची भावना मिळते.

यावेळी विद्यार्थ्यांना पाण्याची टंचाईची समस्या, पाणी बचतीचे महत्त्व याविषयी पटवून देण्यात आले. संवादात्मक सत्रे आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून, विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात पाणी वाचवण्याच्या सोप्या; परंतु प्रभावी मार्गांबद्दल सांगण्यात आले. पावसाळा सुरू झाल्याने डेंग्यू, मलेरिया आणि पाण्यामुळे होणाऱ्या आजारांपासून दूर राहण्यासाठी काळजी कशी घ्यावी, याचे मार्गदर्शन करण्यात आले. पावसाळ्यात घ्यायचे प्रतिबंधात्मक उपाय आणि स्वच्छता पद्धतींबद्दल माहिती देण्यात आली.